**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक २४ मे २०२५**

**ठळक बातम्या**

1. **प्रत्येक राज्यानं किमान एक पर्यटन स्थळ विकसित करावं - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आवाहन.**
2. **दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी भारताची आणखी तीन शिष्टमंडळं परदेशी रवाना.**
3. **देवी अहिल्याबाई होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त उद्या नागपुरात "तत्वज्ञानी राणी देवी अहिल्याबाई होळकर" या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषद.**
4. **नैऋत्य मौसमी पाऊस वेळेआधीच आठ दिवस केरळमध्ये दाखल, नागपुरात आज पावसाचा ऑरेंज अलर्ट.**

---

**नीति आयोग**

**प्रत्येक राज्यानं सर्व पायाभूत सुविधा असणारं जागतिक मानकं पूर्ण करणारं किमान एक पर्यटन स्थळ विकसित करावं, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज राज्यांना सांगितलं. नवी दिल्ली इथं निती आयोगाच्या दहाव्या प्रशासकीय परिषदेच्या बैठकीचं अध्यक्षपद पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भूषवलं, त्यावेळी ते बोलत होते. 'विकसित भारतासाठी विकसित राज्ये-२०४७' अशी या वर्षीच्या बैठकीची संकल्पना आहे. भारताचं झपाट्यानं नागरीकरण होत आहे, राज्य सरकार आणि केंद्र सरकारने एकत्रितपणे काम केलं तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही असं पंतप्रधान यावेळी म्हणाले. या बैठकीला राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्यमंत्री, लेफ्टनंट गव्हर्नर, केंद्रीय मंत्री आणि नीती आयोगाचे उपाध्यक्ष, सदस्य आणि मुख्य कार्यकारी अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.**

---

**बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळं**

**दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी सात बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळं वेगवेगळया देशांना भेटी देत आहेत. याअंतर्गत भाजपाचे खासदार**

बैजयंत पांडा, काँग्रेस खासदार शशी थरुर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वातली तीन सर्वपक्षीय शिष्टमंडळं आज पहाटे परदेशी रवाना झाली. बैजयंत पांडा यांच्या नेतृत्वातलं भारताचं शिष्टमंडळ नुकतंच बाहरेन इथं पोहोचलं. शशी थरुर यांनी समाज माध्यमावर या भेटी संदर्भात संदेश जरी केला आहे-

*(होल्ड बाईट - शशी थरुर - २६ सेकंद)*

*Gives us an opportunity to visit the 9/11 Memorial and remind the world that we like the people they are thinking about their victims of a terrorist attack, and not just this one, but a repeated series of terrorist attacks for the last 4 decades. It's very important that a symbolic gesture should mark the start of our trip. We then go on to Georgetown, Guyana and we would be looking forward to participating in the Independence Day ceremonies in Guyana and also meeting the government officials, ministers, and legislators.*

दरम्यान, द्रमुक खासदार कनिमोळी करुणानिधी यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं रशियाची राजधानी मॉस्को इथं बातमीदारांशी संवाद साधला. यानंतर हे शिष्टमंडळ स्पेन, ग्रीस, स्लोव्हेनिया, लाटवियाला भेट देणार आहे. जनता दलाचे खासदार संजय झा यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं जपानची राजधानी टोकियो इथं ब्राझील, ऑस्ट्रेलिया, कोलंबिया, ग्रीस आणि दक्षिण कोरियाच्या राजदूतांशी संवाद साधला.

-----------------------------------

संयुक्त राष्ट्र

भारत गेल्या अनेक दशकांपासून सीमेपलीकडून होणाऱ्या पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यांना तोंड देत असल्याचं संयुक्त राष्ट्रांमधील भारताचे स्थायी प्रतिनिधी पी. हरीश यांनी म्हटलं आहे. सशस्त्र संघर्षांमध्ये नागरिकांच्या संरक्षणावरील खुल्या चर्चेदरम्यान त्यांनी हे वक्तव्य केलं. ऑपरेशन सिंदूरमध्ये मारल्या गेलेल्या कुख्यात दहशतवाद्यांच्या अंत्यसंस्कारात पाकिस्तानातील वरिष्ठ सरकारी, पोलिस आणि लष्करी अधिकारी उपस्थित असल्याचं जगानंही पाहिलं असल्याचं पी. हरिश यांनी म्हटलं. नागरिक आणि दहशतवादी यांच्यात पाकिस्तान फरक करत नाही, हे याचे द्योतक आहे, त्यामुळे संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षाविषयक चर्चेत पाकिस्तानचा सहभाग हा चिंतेचा विषय असल्याचं भारतानं

म्हटलं आहे. तसंच याबाबत भारतानं निषेध व्यक्त करत काही प्रश्नही उपस्थित केले. दहशतवादाला प्रोत्साहन देण्यासाठी पाकिस्ताननं वारंवार नागरिकांचा ढाल म्हणून वापर केला असून पाकिस्तानी सैन्यानं या महिन्याच्या सुरुवातीला जाणूनबुजून भारतीय सीमावर्ती गावांना लक्ष्य केलं होतं, असंही पी. हरिश यांनी म्हटलं आहे.

-----------------------------------

मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या रविवारी अकरा वाजता आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधणार आहेत. हा कार्यक्रमाचा १२२ वा भाग असणार आहे. आकाशवाणीसह दुरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरुन या कार्यक्रमाचं प्रसारण होईल.

-----------------------------------

हज

हज यात्रेकरूंना कोणतीही अडचण न येता यात्रा सुरळीत पार पडावी, यासाठी नागपूर विमानतळावर केलेल्या उत्कृष्ट व्यवस्थेची पाहणी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष  प्यारे खान यांनी काल  रात्री केली. या वेळी त्यांनी विविध सुविधा तपासून समाधान व्यक्त करत CISF अधिकाऱ्यांच्या कार्यप्रणालीचे विशेष कौतुक केले. यावेळी अहराम परिधान करण्याची व्यवस्था, यात्रेकरूंना विश्रांती घेण्याची आणि आरामदायक विश्रांती घेण्याची जागा, वज़ू व नमाजासाठी स्वतंत्र जागा, सुरक्षा आणि स्वयंसेवकांची तयारी याबाबत खान यांनी समाधान व्यक्त केले. विशेष म्हणजे, यंदा यात्रेकरूंना इमिग्रेशन प्रक्रियेसाठी अधिक वेळ मिळावा म्हणून ही प्रक्रिया उड्डाणाच्या सहा तास आधी सुरू करण्यात आली आहे.

-----------------------------------

अहिल्याबाई होळकर जयंती

लोकमाता देवी अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त उद्या रविवार  २५ मे रोजी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट नागपूर येथे "तत्वज्ञानी राणी देवी अहिल्याबाई होळकर" या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषद आयोजित केली जाईल. देवी अहिल्याबाई स्मारक समिती- नागपूर, मिथिक सोसायटी- बेंगळुरू, आयआयएम-  नागपूर, डब्ल्यू.ई.एस.श्रीमती मनोरमाबाई मुंडले कॉलेज ऑफ आर्किटेक्चर- नागपूर आणि महाराष्ट्र राष्ट्रीय कायदा विद्यापीठ-

नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित केला आहे. केंद्र सरकारच्या माजी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांच्या उपस्थितीत एक विशेष स्पॉटलाइट सत्र होईल. समारोप समारंभात केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. राष्ट्र सेविका समितीच्या अखिल भारतीय सरकार्यवाहिका चित्रा जोशी, सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

-----------------------------------

हवामान

२००९ नंतर यंदा प्रथमच नैऋत्य मान्सून भारतात दाखल होत आहे. नैऋत्य मान्सून पुढील २४ तासांत केरळमध्ये दाखल होण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. दरम्यान, येत्या दोन ते तीन दिवसांत केरळ, आणि कर्नाटकच्या किनारपट्टीवर अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे तसंच दक्षिण कोकण, कर्नाटकच्या किनारी भाग, मध्य महाराष्ट्र, गोवा इथं मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. दरम्यान, हवामानातील बदलाच्या परिणामस्वरूप आज विदर्भातील नागपूर आणि चंद्रपूर इथं पावसाचा ओरेन्ज अलर्ट आणि इतर सर्वच जिल्ह्यामध्ये विजांच्या कडकडाटासह पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. आज गोंदिया इथं सर्वाधिक ३४ पूर्णांक २ अंश सेलसिअस इतक्या कमाल तर चंद्रपूर इथं २२ पूर्णांक २ अंश सेलसिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

-----------------------------------

आयपीएल

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत, आज पंजाब किंग्जचा सामना दिल्ली कॅपिटल्स बरोबर जयपूर इथं होणार आहे. हा सामना आज सायंकाळी साडेसात वाजता खेळवला जाईल. दोन्हीही संघ प्ले-ऑफच्या लढतीसाठी याआधीच अपात्र ठरले आहेत, हा सामना आज केवळ औपचारिक असणार आहे.

-----------------------------------

महावितरण

वीजपुरवठा खंडित झाल्यास वीज कर्मचारी किंवा त्यांच्या वरिष्ठांना फोन करून वेळ वाया घालविण्यापेक्षा वीजग्राहकांनी 24 तास सुरु असलेल्या 1912, 18002333435 व 18002123435 या तीन पैकी एका टोल फ्री क्रमांकावर वीजपुरवठा व वीजबिलासंबंधिच्या तक्रारी नोंदवाव्यात असे आवाहन महावितरणने

केले आहे. दरम्यान, येणारा पावसाळा वीज ग्राहकांना सुसह्य व्हावा यासाठी मान्सुनपुर्व देखभाल व दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर पुर्ण करण्याच्या सुचना महावितरणच्या नागपुर परिक्षेत्राचे प्रादेशिक संचालक परेश भागवत यांनी दिल्या. पुढील तीन ते चार दिवस वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता असल्याने, या कालावधीसाठी आणि संपूर्ण पावसाळ्यासाठी आपत्कालीन नियोजन करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

------------------------------------

नाईक तलाव

केंद्र सरकारच्या अमृत योजना टप्पा २ अंतर्गत नागपूरच्या नाईक तलाव पुनरुज्जीवन प्रकल्पामध्ये तलावाच्या सौंदर्यीकरणासाठी सरकारकडे सादर करावयाच्या प्रस्तावित कामाचा आढावा मनपा आयुक्त आणि प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी घेतला. नाईक तलाव पुनरुज्जीवन प्रकल्पाचे दोन टप्प्यात काम होत आहे. यापैकी पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. यात नाईक तलावातील गाळ काढणे, तलावाचे खोलीकरण तसेच संरक्षण भिंत बांधण्याचे काम पूर्ण झाले आहे. दुसऱ्या टप्प्याचे काम आता प्रस्तावित आहे. यात तलावाच्या सौंदर्यीकरणावर भर दिला जाणार आहे.

------------------------------------

मलेशिया मास्टर्स

क्वालालंपूर इथं सुरु असलेल्या मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीत भारताच्या किदम्बी श्रीकांतनं आज अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. त्यानं उपांत्य फेरीत जपानच्या युशी तनाका याचा २१-१८, २४-२२ असा पराभव केला.

------------------------------------